# मसीहाच्या येण्याचे भविष्य संदेष्ट्यांनी सांगितले

मुलांना शिकविणाऱ्यांनी P8b हा अभ्यास वाचावा.

## 1. मसीहा विषयीची भविष्ये शिकविण्यासाठी प्रार्थनापूर्वक वचनातून तयारी करा.

**प्रार्थना:** ''प्रिय स्वर्गीय पित्या, कृपा करून मसीहा, येशूच्या येण्याविषयीची अनेक भाकिते तू कशा प्रकारे परिपूर्ण केलीस याबद्दल माझ्या मंडळीला आनंद करण्यास तसेच त्याच्या परत येण्याची आशा धरण्यास साहाय्य कर.''

### पार्श्वभूमी स्पष्ट करणाऱ्या टीपा

**टीप अ.** ''मसीहा'' हे शीर्षक यहूदी लोकांनी जुन्या कराराच्या काळात त्यांच्या राजाना दिले होते. त्यांनी ''मसीहा'' हे शीर्षक एके दिवशी महान राजा येऊन सर्व पृथ्वीवर राज्य करणार आहे, त्याच्याविषयी बोलण्यासही वापरले. मसीहा म्हणजे ''अभिषेक केलेला'' आणि पुष्कळदा त्याचा अनुवाद ख्रिस्त असा केला जातो म्हणून, येशू ख्रिस्त या नावाचा अर्थ येशू मसीहा असा आहे.

**टीप ब.** यहूदी लोकांना त्यांचा पूर्वज अब्राहाम याच्यापासून सुरुवात केली तर सुमारे 4000 वर्षांचा इतिहास आहे. त्यांनी मसीहा येण्याची 2000 वर्षे वाट पाहिली. तो आला तेव्हा पुष्कळांनी त्याच्यावर विश्वास ठेवला पण बहुतेकांनी तसे केले नाही. 2000 वर्षांनंतर, आज अनेक यहूदी लोक येशू त्यांचा मसीहा आहे असा विश्वास ठेवतात; पण, बहुतेक लोक तसे करीत नाहीत. विश्वास न ठेवणारे अद्याप मसीहाची वाट पहात आहेत.

**टीप क.** पवित्रशास्त्र खरे आहे आणि येशू हा मसीहा आहे असे म्हणण्यास अनेक कारणे आहेत: (1) येशूने फक्त देवालाच करता येतील अशा अनेक गोष्टी केल्या, (2) येशूच्या नावामध्ये केलेल्या आपल्या प्रार्थनांची देव उत्तरे देतो; (3) आम्ही येशूचे अद्‌भुत चमत्कार व दृष्टांत पाहिले आहेत; (4) येशू हा इतर सर्व आत्म्यांपेक्षा सामर्थ्यवान आहे; (5) ख्रिस्त आम्हाला आनंद व शांती देतो; (6) अन्य कोणीही येशू सारखे नाही; (7) विश्वासणाऱ्यांच्या अंत:करणात राहणारा पवित्र आत्मा आमच्या सत्याच्या आत्म्याचा साक्षीदार आहे.

पवित्र शास्त्राने कित्येक वर्षांपूर्वी शेकडो भाकिते केली आणि त्यातील अनेक अगोदरच खरी झालेली आहेत, हे विश्वास ठेवण्याचे आणखी एक कारण होय. जुन्या करारामध्ये, संदेष्ट्यांनी येणाऱ्या मसीहाविषयी सुमारे 210 भाकिते वर्तविली आहेत. नव्या करारामध्ये येशूने त्यापैकी 150 भाकिते पूर्ण केली आणि उर्वरित भाकिते तो एके दिवशी पृथ्वीवर परत येईल तेव्हा पूर्ण करणार असे त्याने सांगितले.

**टीप ड.** ख्रिस्ती लोक म्हणजे अभिवचनाने देऊ केलेला मसीहा आला आहे आणि तो येशू आहे असा विश्वास ठेवणारे यहूदी व यहूदीतर लोक होय.

### जुन्या करारातील भाकितांची तुलना नव्या करारातील त्यांच्या परिपूर्ततेशी करा

- यशया 9:6-7 तुलना करा मत्तय 2:1-11 एक खास बालक राजा म्हणून जन्म घेणार आहे त्याविषयी.
- मीखा 5:1 तुलना करा मत्तय 2:1-11 येशूचा जन्म कोठे होणार
- यशया 11:1-4 तुलना करा मत्तय 5:1-12 सौम्य व दीनांना सूज्ञपणे मार्गदर्शन करण्याविषयी.
- यशया 53:4 तुलना करा मत्तय 8:14-17 लोकांचे आजार बरे करण्याविषयी
- अनुवाद 18:15 तुलना करा योहान 6:10-15 लोकांना अद्‌भूत प्रकारे अन्न पुरविण्याविषयी
- दानीएल 9:25-26 तुलना करा मत्तय 24:14-25 मसीहाच्या येण्यानंतर होणाऱ्या छळाविषयी
- जखऱ्या 9:9 तुलना करा मत्तय 21:1-11 यरूशलेमेमध्ये गाढवावर बसून प्रवेश करण्याविषयी.
- यिर्मया 31:31-34 तुलना करा लूक 22:17-22 नवा करार स्थापन करण्याविषयी.

- यशया 53:12 तुलना करा लूक 22:37 येशूची अपराध्यांत गणना होण्याविषयी.
- स्तोत्र 22:14-18 तुलना करा मत्तय 27:32-50 येशूच्या वधस्तंभावरील मरणाविषयी.
- जखऱ्या 12:10 तुलना करा योहान 19:34:37 मसीहाला कशा प्रकारे भाला भोसकण्यात आला त्याविषयी.
- यशया 53:7-8 तुलना करा प्रे. कृ. 8:29-35 आमच्या पातकांसाठीचे येशूच्या प्रायश्चित्ताच्या मरणाविषयी.
- स्तोत्र 16:9-11 तुलना करा लूक 24:46-48 तुलना करा प्रे. कृ. 2:22-28 येशूच्या पुनरुत्थानाविषयी.

आणखी एका प्रकारे भविष्ये वर्तवण्यात आली आहेत जुन्या करारातील अनेक प्रतिरूपे येशूने परिपूर्ण केलेली आहेत. उदाहरणार्थ, 1 करिंथ 15:45 मध्ये येशूला 'शेवटचा आदाम' असे म्हटलेले आहे, शिवाय येशू आणि आदाम यांच्यातील महत्वपूर्ण सारखेपणा व विरोधाभास रोम 5:12-21 व 1 करिंथ 15:20-23,45-50 याठिकाणी दिसतो. येशू वा आदाम हे दोघेही नव्या मनुष्यजातीचे प्रमुख आहेत आणि दोघांनीही आपआपल्या कृत्यांच्या द्वारे त्यांच्या त्याच्या वंशावर दूरगामी परिणाम घडवून आणले.



आदामाला सैतानाने भुरळ घातली आणि त्याने देवाची अवज्ञा केली.



येशूची सैतानाने मोहपरीक्षा पाहिली तेव्हा त्याने प्रतिकार केला

एका खास विशेष अभ्यासासाठी (हा अधिक वेळ खाणारा आहे) आम्ही येशू आणि पुढील लोक यांच्यामधील अनेक तुलना तसेच फरक शोधून काढण्याची शिफारस करतो:

**आदाम** (उत्पत्ती अध्याय 2 व 3)

**इसहाक** (उत्पत्ती 22)

**योसेफ** (उत्पत्ती अध्याय 37 व 39-48)

**मोशे** (निर्गम व गणना या पुस्तकांतील चित्रण)

**अहरोन** (निर्गम व लेवीय या पुस्तकांतील चित्रण)

**यहोशवा** (यहोशवा)

**बवाज** (रूथ)

**दावीद** (1 शमुवेल 16-31 आणि 2 शमुवेल अध्याय 1 ते 24)

**एलीया** (1 राजे अध्याय 17 ते 19 आणि 2 राजे अध्याय 2)

**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यातील कार्यक्रम ठरवा**

तुम्ही लोकांच्या भेटी घेऊन साक्ष देता, तेव्हा त्यांना संदेष्ट्यांनी मसीहाच्या येण्याविषयी कशी भविष्ये वर्तविली आणि ती भविष्ये येशूने कशा प्रकारे पूर्ण केली ते स्पष्ट करून समजावून सांगा. विश्वासणारे व देवाचा शोध करणाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या शंका दूर करा आणि विश्वास ठेवण्यासाठीच्या कारणांचा विचार करण्यासाठी प्रोत्साहन द्या. येशूने त्यांना आशीर्वाद द्यावा आणि स्वत:ला चांगले व सामर्थ्यवान दाखवावे यासाठी प्रार्थना करा.

- तुम्ही शिकवीत असलेल्या नव्या नेत्यांकडे पवित्र शास्त्र हे देवाचे वचन आहे अशी अद्याप खात्री पटलेले लोक असतील तर त्यांनाही हा अभ्यास वाचण्यास द्या.
- समजा काही विश्वासणाऱ्यांना पवित्र शास्त्र वाचून अभ्यास करण्याची इच्छा असेल तर त्यांना वर दिलेल्या यादीतील जुन्या करारातील नेते आणि येशू यांच्यातील सारखेपणा व फरक शोधण्यास सांगा.

**3. तुमच्या सहकाऱ्याशी चर्चा करून येणाऱ्या उपासनासभेविषयी योजना आखा.**

पवित्र शास्त्रातून जुन्या करारातील काही भविष्ये आणि नव्या करारातील त्यांची परिपूर्ती हे विश्वासणाऱ्यांना एकत्रित वाचायला सांगा. प्रत्येक वेळी येशूने भविष्य कशा प्रकारे पूर्ण केले ते विचारा.

गतकाळात पूर्ण झालेल्या भविष्यांमुळे उर्वरित भाकितेही भविष्यकाळात पूर्ण होणार आहेत याची खात्री आम्हाला मिळते हे स्पष्ट करा.

येशू आणि वर दिलेल्या यादीतील जुन्या करारातील नेत्यांपैकी किमान एकजण यांच्यातील सारखेपणा व फरक स्पष्ट करा.

पार्श्वभूमी स्पष्ट करणाऱ्या अ. ब. क किंवा ह्या टीपांचे स्पष्टीकरण करा, यातील एखादी टीप विश्वासणारे व देवाचा शोध करणाऱ्यांना उपासनेमध्ये उपयोगी पडेल

मुलांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करण्यास त्यांना संधी द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी 1 करिंथ 11: 26 हे वचन मोठ्याने वाचा. मसीहा परत येऊन आपली उर्वरित अभिवचने पूर्ण करण्याची वाट पाहात ख्रिस्ती लोक जवळ गेली 2000 एकत्रितपणे भाकरी व प्याल्याचे सेवन करीत आहेत, हे स्पष्ट करून सांगा.

पाठ करा लूक 24:27 ''मग त्याने (येशूने) मोशे व सर्व संदेष्टे ह्यांच्यापासून आरंभ करून संपूर्ण शास्त्रातील आपणाविषयींच्या गोष्टींचा अर्थ त्यांना सांगितला.''

दोन किंवा तीन जणांचे लहान गट तयार करा आणि येशू विषयीच्या प्राचीन भाकितांबद्दल चर्चा करा, योजनाना मंजुरी द्या, आणि एकमेकांना प्रोत्साहन द्या. मुलांना स्वर्गात वाढणाऱ्या जीवनाच्या झाडाचे साधे चित्र काढण्यास सांगा, हे चित्र त्यांनी उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांना दाखवून ह्या जीवनाच्या झाडाद्वारे स्वर्गात देवाकडून आरोग्य मिळणार असल्याचे सांगा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net